PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bai Mothi Bhagyachi
Year: 1968

Song: Majhe Malach Vede
Lyricist: Vinayak Rahatekar

माझे मलाच वेडे
कोडेच एक आहे
तुजला मी काय सांगू
न कळे मी कोण आहे
तुजला मी काय सांगू
न कळे मी कोण आहे

मी छत्रहीन होते
इच्छित रे निवारा
तो लाभला परंतु
जळता जिथे निखारा
डोळ्यात हास्य एका
अश्रू दुजात वाहे
तुजला मी काय सांगू
न कळे मी कोण आहे
तुजला मी काय सांगू
न कळे मी कोण आहे

मी वेल ज्या तरूला बिलगावयास गेले
तो दूर होऊनिया त्याने निराश केले
निर्माल्य भावनांचा परी त्याग पूर्ण आहे
तुजला मी काय सांगू
न कळे मी कोण आहे
तुजला मी काय सांगू
न कळे मी कोण आहे

तो देव काय माझी पाहे अशी परीक्षा
अधुऱ्यात राहती का साऱ्या अशा अपेक्षा
मी अग्निदीव्य कुठले करण्यास सिद्ध आहे
तुजला मी काय सांगू
न कळे मी कोण आहे
तुजला मी काय सांगू
न कळे मी कोण आहे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*